# साय-फाय करंडकचे आयोजन

**मुंबई** : क्विक हील फाऊंडेशन, थिएटर ॲकॅडमी आणि महाराष्ट्र सायबर पोलीस यांचा संयुक्त उपक्रमाने 'साय-फाय करंडक'चे आयोजन केले आहे. यासाठी राज्यातून प्रवेशिका मागवण्यात आल्या आहेत. साय-फाय करंडक ही एक एकांकिका स्पर्धा आहे, जिचा उद्देश तत्कालीन थिएटरच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत जागरूकता पसरवणे हा आहे.

कॉलेज, स्वतंत्र गट आणि थिएटर संस्थांकडून प्रवेशिका १५ नोव्हेंबर २०१८ पर्यंत स्वीकारण्यात येतील. सहभागी टीम नाट्य वर्तुळातील नोंदणीकृत गट असणे अनिवार्य आहे. थिएटर ॲकॅडमी आपले अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध नाट्यकर्मी प्रसाद पुरंदरे यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील कोनाकोपऱ्यातून आलेल्या प्रादेशिक केंद्रांच्या टीम्सची निवड करेल. या टीम अशा समकालीन विचारप्रवण एकांकिका सादर करतील, ज्यामध्ये डिजिटल दुनियेत आजच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसत असेल. साय-फाय करंडकाच्या माध्यमातून क्विक हील फाऊंडेशन आणि महाराष्ट्र राज्य पोलीसची सायबर सुरक्षा जागरूकता आणण्यासाठी नावीन्यपूर्ण प्रयोग करून एक सुरक्षित सायबर विश्व उभे करण्याची वचनबद्धता व्यक्त होते. साय-फाय करंडक २०१८ मध्ये अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या एकांकिका १६ डिसेंबर २०१८ रोजी ग्रँड फिनालेमध्ये सादर होतील व त्यावेळी या कलाकारांना नाटक, सिनेमा आणि टीव्हीवरील मान्यवर कलाकारांच्या ज्यूरी पॅनलसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे.